क्रमांक: १४१५६ /क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक: १ सप्टेंबर, २०२३.

**:: कार्यालयीन आदेश ::**

या सचिवालयातील तात्पुरत्या पदोन्नतीमुळे/सेवानिवृत्तीमुळे रिक्त झालेल्या एस-६ :१९९००-६३२०० या वेतनस्तरातील **"लिपिक-टंकलेखक"** या पदावर 'गट-ड' संवर्गातील खालील कर्मचाऱ्यांची तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आली आहे :-

| अ.क्र. | 'गट-ड' संवर्गातील कर्मचाऱ्यांची नावे |
|---|---|
| १. | श्री.योगेश भोईर, शिपाई (सद्य:स्थितीत मा.उप मुख्यमंत्री, (श्री.अजित पवार) यांच्या आस्थापनेवर शिपाई पदावर कार्यरत) |
| २. | श्री.शिवाजी पाटील, शिपाई |
| ३. | श्री.महेश डिकवलकर, शिपाई |
| ४. | श्री.अजिंक्य दिंडे, मदतनीस |

संबंधित कर्मचाऱ्यांना 'लिपिक-टंकलेखक' पदावर तात्पुरती पदोन्नती खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे:-

१. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्रमांक २७९७/२०१५ मध्ये दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णया विरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन-१६-ब यांच्या शासन निर्णय दिनांक ७ मे, २०२१ मधील तरतूदीनुसार पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दिनांक २५ मे, २००४ च्या स्थितीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून भरण्यात येत आहेत.

२. लिपिक-टंकलेखक संवर्गातील पदोन्नत्या तात्पुरत्या स्वरुपात प्रशासकीय निकड म्हणून देण्यात येत आहेत.

..२/-

३. या तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधित कर्मचाऱ्यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

४. लिपिक-टंकलेखक संवर्गातील सदर पदोन्नती मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ च्या अधीन राहून करण्यात येत आहे.

५. अनुक्रमांक १ वरील श्री.योगेश भोईर यांना ही तात्पुरती पदोन्नती महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ४०, परिशिष्ट-२, अट क्र. १८ नुसार तात्पुरत्या स्वरुपात प्रपत्र बढती (पदोन्नती) देण्यात येत आहे. सदर तरतूदीनुसार प्रपत्र बढतीचा कालावधी हा आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्यांचा राहील. त्यानंतर श्री.योगेश भोईर यांनी या सचिवालयात हजर होणे आवश्यक राहील.

६. तसेच त्यांना असे ही कळविण्यात येते की, उक्त पदावर पदोन्नतीनंतर त्यांचे काम असमाधानकारक आढळल्यास त्यांना मूळ पदावर पदावनत करण्यात येईल.

आदेशानुसार,

**(सुभाष नलावडे)**
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**प्रति,**

उपरोक्त सर्व संबंधित कर्मचारी.

**प्रतिलिपी :-**

१) मा.उप मुख्यमंत्री (श्री अजित पवार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

२) मा. सचिव-१ (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

३) मा.सचिव-२ (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

४) अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन-२१), मंत्रालय, मुंबई.

..३/-

५) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.

७) या सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष.

८) कक्ष अधिकारी, ग-१ (सामान्य) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

९) कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

१०) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

११) 'क-२' (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

१२) वैयक्तिक नस्ती.

१३) निवडनस्ती.